कोर्ट वि. माधवराव केळवदकर तहसिलदार यांचे कार्यालय, कामठी

रा.मा.क्र. १८ एनएपी-३४/२००१-०२
मौजा-रनाळा, प.ह.नं. १८
तालुका कामठी, जिल्हा नागपूर

आदेश

(पारित दिनांक ३० दिसंबर २००२)

१) अर्जदार मंगेश पुनाजी ठाकरे यांनी मौजा रनाळा, पटवारी ह.नं. १८ तालूका कामठी जिल्हा - नागपूर येथील सर्व्हर्क नं. ११५/४ आराजी २.४५ यामध्ये ०.८१ हे.आर (८१०० चौ.मी.) प्रयोजनाकरिता अकृषिक करण्यावी परवनगी मिळावी करिता अर्ज केल्यावरून सदहू प्रकरण सुरु करण्यात आले.

२) अर्जदाराने अर्जासोबत शेतीचा ७/१२ व नकाशा, अधिकार अभिलेख जोडलेला, शेतीचा ७/१२ नुसार मौजा-रनाळा प.ह.नं. १८ तालुका कामठी, जिल्हा नागपूर येथील शेत सर्व्हे नंबर ११५/४ कास्तकर मंगेश पुनाजी ठाकरे राह. रनाळा यांचे नावाने आहे.

३) संबंधित प्रकरणात जाहीरनामा काढण्यात आलेलाअसून मौक्यावर व ग्राम पंचायत नोटिस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आला परंतू विहित तारखेचे आंत कोणाचेही आक्षपे नाहीत.

४) संबंधित प्रकरणात ह्या कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रस्तू-१/तह. कामठी/कावि-क्यू/२००१-०२ अन्वये नगर रचना विभाग नागपूर कार्यकारी अभियंता, नागपूर सविव, सरपंच ग्राम पंचायत रनाळा यांचे अभिप्राय मागविण्यात आलेले होते परंतु विहित तारखेचे आंत कोणावेही आक्षेप नाहीत.

५) सरपंच, ग्राम पंचायत रनाळा यांनी ठराव पारित करून हे ठरावाची प्रत प्राप्त झालेली आहे त्यानुसार अर्जदारास परवानगी देण्यास हरकत नाही असे दर्शविलेले आहे.

तलाठी साझा क्रमांक १८ यांनी अहवाल सादर केलेला असून तो संयुक्तीक आहे.

वरील सर्व बाबींचा विचार करता तहसिलदार, कामठी मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ व त्या अंतर्गत प्र.अ.म. (जमिनीच्या वापरात अकृषिक परवानगी) नियम १९६६ चे कलम व नियम ४ व त्या अंतर्गत नियम व उपनियमातील शर्ती व अटीस अधिन राहून सर्व्हे नं. १८ आराजी २.४५ मध्ये ०.८१ हे. आर (८१०० चौ.मीटर) शेत जमीन निवासी प्रयोजनाकरिता अकृषिक परवानगी देण्यात येत आहे.

शर्ती व अटी :-

१) जमिनीचा वापर १ वर्षाचे आत निवासी प्रयोजनात उपयोगात आणणे आवश्यक राहील.

२) अर्जदारास ही परवानगी निवासी प्रयोजनाकरिता देण्यात आलेली ओ. त्याशिवाय इतर उपयोगात आणता येणार नाही.

३) अर्जदारास ही जमीन इतर उपयोगात आण्यावी असल्यास त्यांनी मा. जिल्हाधिकारी नागपूर तसेच नगर रचना विभाग यांचे कडूनप परवानगी घेणे आवश्यक राहील.

४) अर्जदारास संबंधित जमिन शेतीची असल्यामुळे ती निवासी प्रयोजनाकरीता उपयोगात आणावयाची असल्यामुळे अकृषिक करावे ३ पट रू. १६४५/- (रुपये एक हजार सहासे चौरात्तर) ही परावर्तीत करावी अर्जदारास एकदा सरकार जमा करावी लागेल.

५) शेतीची जमीन निवासी प्रयोजनाकरीता अकृषिक करण्याकरीता अकृषिक कर, दर, दर चौरस मिटरला ०.०२ पैसे प्रमाणे २.४५ मध्ये ०.८१ हे. आर (८१०० चौ.मीटर) रूपये जमिन महसूल ५५८ ग्रामपंवायत सेस जिल्हा परिषद सेस २७९० ही रक्कम सरकार जमा करणे आवश्यक राहील.

माझे सही व शिक्यानिशी

तहसिलदार कामठी 30/92

प्रतिलिपी :-

१. अर्जदार मंगेश पुनाजी ठाकरे, राह. रनाळा

२. वसुल बाकी नविस शाख तहसिल कार्यालय, कामठी यांना अग्रेषित.

३. तलाठी साझा क्रमांक १८ तालुका कामठी यांना रेकॉर्डलीा नोंद घेण्याकरिता अग्रेषित.

४. तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख, कामठी यांना रेकॉर्डला नोंद घेण्याकरिता अग्रेषित.

तहसिलदार कामठी